॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १९ ( ) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्याकडून प्राप्त अनुदानातून विद्यापीठ परिसरात बी.एस.एन.एलकडून वायफाय सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार असून त्यासाठी येणाऱ्या १ कोटी २० लाख ८० हजार रुपये खर्चाच्या प्रस्तावाला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

सोमवार,दि.१९ मार्च,२०१८ रोजी व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. रुसाकडून विद्यापीठ कॅम्पस वायफाय करण्यासाठीचा प्रस्ताव जळगाव येथील बी.एस.एन.एल.कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. १ कोटी २० लाख ८० हजार २५० रुपयांचा हा प्रस्ताव असून १ कोटी रुपये रुसाकडून प्राप्त झाले आहेत. उर्वरित रक्कम विद्यापीठ निधीतून खर्च करण्यास व्यवस्थापन परिषदेने आजच्या बैठकीत मान्यता दिली. बी.एस.एन.एल.कडून ६८ लाख रुपयांचे २५ हॉटस्पॉट विनामूल्य उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.

आजच्या बैठकीत इतर अनेक विषयांवर दिवसभर चर्चा होऊन त्यांना मान्यता देण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी नुकत्याच झालेल्या पदवीप्रदान समारंभाचे उत्तम आयोजन केल्याबद्दल तसेच जिल्हावार युवक महोत्सव घेतल्याबद्दल कुलगुरुंचे व प्रशासनाचे आभार व्यक्त करणारा ठराव प्रा.एस.टी.इंगळे व प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी यांनी मांडला. त्याला डॉ.सुभाष चौधरी अनुमोदन दिले. आजच्या बैठकीत विविध विषयांवर झालेल्या चर्चेत दिलीप पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, डॉ.सुभाष चौधरी, प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी, प्राचार्य एल.पी.देशमुख, प्रा.नितीन बारी, दिपक पाटील, प्रा.मोहन पावरा, विवेक लोहार यांच्यासह प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, सहसंचालक डॉ.केशव तूपे, वित्त व लेखाधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड यांनी भाग घेतला. बैठकीचे सुत्रसंचालन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १९ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)